**पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकिकरण करण्यासाठी करावयाच्या उपाय योजना**

-------------------------------------

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**परिपत्रक क्र: ग्रापापु-१०९६/प्र.क्र.१२९०/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : १९ मार्च, १९९७.**

**वाचा :-** १) शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२८०/पापु ०७ दिनांक २८/११/९६
२) शासन पत्र क्रमांक ग्रापापु १०९६/प्र.क्र.१२९०/पापु ०७ दिनांक ६ फेब्रुवारी १९९७.

**परिपत्रक**

पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्याबाबत उपरोक्त दिनांक २८/११/९६ च्या शासन निर्णयाद्वारे सविस्तर सुचना देण्यात आल्या आहेत. त्यांच्याच अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पुढील पुरक सुचना देण्यात येत आहेत :-

१) पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी टी.सी.एल. पावडर/ तुरटी टाकण्याचे काम करण्यासाठी ग्रामपंचायतीने/जिल्हा परिषदेने प्रत्येक वाडी/गाव यासाठी एक पाणी कर्मचारी निश्चित करावा. यावर कार्यवाही ३१.३.१९९७ पर्यत पूर्ण करुन शासनास अनुपालन अहवाल १५.४.९७ पर्यंत पाठवावा.

२) शासनाच्या दिनांक २८.११.९६ च्या शासन निर्णयातील आदेशांनुसार प्रत्येक गावात ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन झाली आहे याची खात्री करुन घेण्यात यावी. यावर कार्यवाही दिनांक ३१/४/१९९७ पर्यंत पूर्ण करुन अनुपालन अहवाल १५.५.९७ पर्यंत पाठवावा.

३) विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत) यांनी प्रत्येक गावाला भेटी देऊन ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची जबाबदारी व कार्ये समितीच्या पदाधिकाऱ्यांना समजावून सांगावी. याबाबत कार्यवाही दिनांक ३१.५.९७ पर्यंत निश्चितपणे पूर्ण करुन शासनास अनुपालन अहवाल १५.६.९७ पर्यंत जरुर पाठवावा.

४) जिल्हयातील गावे/वाडयासाठी लागणाऱ्या ओ.टी. टेस्टसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची खरेदी जिल्हा परिषदेने सार्वजनिक आरोग्य समितीमार्फत जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून करावी. यावर कार्यवाही ३१.३.९७ पर्यंत पूर्ण करुन अनुपालन अहवाल १५.४.९७ पर्यंत मिळणे अत्यावश्यक आहे.

५) विस्तार अधिकारी (आरोग्य) यांनी प्रत्येक दोन महिन्यात एकदा पाणी पुरवठा योजनांना भेटी देवून पहाणीत त्रुटी आढळल्यास त्याबाबतचा अहवाल संबधीत ग्राम पंचायत व जिल्हा परिषदेस दयावा. याची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.

६) जिल्हयातील पिण्याचे पाणी पुरवठा योजनेच्या स्त्रोताचे आधारे टि.सी.एल. पावडरची पूर्ण जिल्हयाची गरज लक्षात घेवून संपुर्ण जिल्हयासाठी दर करार सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५.६.९७ पर्यत निश्चित करावेत व शासनास पूर्तता अहवाल ३१.३.९७ पर्यंत पाठवावा.

७) तीन महिने पुरेल इतका साठा आवश्यकतेनुसार १,१० वा २५ किलोच्या सिलबंद डब्यातून विकत घ्यावा. टि.सी.एल. पावडरची वाटपाची जबाबदारी गट विकास अधिकाऱ्यांनी पार पाडावी. त्याचप्रमाणे टि.सी.एल. पावडरच्या खरेदी व पुरवठयाचे निश्चित वेळापत्रक ठरवून घ्यावे.

८) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने प्रत्येक मासिक बैठकीत टी.सी.एल. पावडरची गुणवत्ता, साठा व पुरवठा इ. सर्व बाबींचा आढावा न चुकता घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**आपला**

**(ग. गो. पंचभाई)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.
विभागीय मुख्य अभियंता (सर्व) महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ.
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ.
कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ.
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व).
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व).
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी.
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.